**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २० जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **उद्या २१ जूनला साजरा होणार जागतिक योग दिन, नागपुरात भरगच्च कार्यक्रम.**
- **शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना मिळणार महात्मा फुले जन-आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजनेचा लाभ.**
- **मनपातर्फे सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविकांना पुरस्कार प्रदान-यजुकला गजभिये, संगीता वानखेडे आणि सारिका झाडे ठरल्या पुरस्काराच्या मानकरी.**
- **विदर्भात येत्या २४ तारखेपर्यंत सर्व जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमान रहाण्याचा अंदाज- सरासरी तापमानात घट.**

*****

योग दिन-प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्था

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या होणाऱ्या जम्मू काश्मीर मधील मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर आहेत. दरम्यान केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान संशोधन परिषद (सीसीआरएएस), आयुष मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत नागपूरच्या प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्थेतर्फे उद्या सकाळी 6.30 वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार आहे. यंदा योग दिनाची मध्यवर्ती संकल्पना "स्वत:साठी आणि समाजासाठी योग" ही आहे. योगाभ्यासाचे दीर्घकालीन फायदे या कार्यक्रमाच्या माध्यमानं स्पष्ट केले जातील असं प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्थेचे सहायक संचालक डॉ.मिलिंद सूर्यवंशी यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ते पत्रकार परिषदेत बोलत होते. दरम्यान, या कार्यक्रमात सामाईक योग प्रोटोकॉल म्हणून ओळखले जाणारे 45 मिनिटांचे योग प्रात्यक्षिक दाखवले जाणार आहेत. सामाईक योग प्रोटोकॉल प्रात्यक्षिक हे 22 भारतीय भाषांमध्ये, 6 यूएन भाषांमध्ये आणि 9 इतर परदेशी भाषांमध्ये यूट्यूबवर उपलब्ध आहेत. याशिवाय नागपूर महानगर पालिका, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, विविध

संस्था, संघटना, योगाभ्यासी मंडळं अश्या विविध ठिकाणी योग दिनानिमित्त कार्यक्रम, प्रात्यक्षिकं, व्याख्यान आदींचं आयोजन करण्यात आलं आहे. वर्धा इथं देखील उद्या सकाळी ६.३० वाजता "आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या" कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

योगदिन-आंतरराष्ट्रीय

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त देशोदेशी कार्यक्रम होत आहेत. बांगलादेशात भारतीय राजदूतावासानं ढाका येथील मिरपूर इनडोअर स्टेडिअममध्ये उद्या योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं असून, या कार्यक्रमात बांगलादेशची योग संघटना सहभागी होणार आहे. नेपाळमधल्या भारतीय दूतावासानं काल पोखरा इथं फेवा तलावाच्या काठी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं होतं. त्यात स्थानिक रहिवासी, स्थानिक प्रशासन यंत्रणांचे अधिकारी, भारतीय लष्करातील निवृत्त गोरखा जवान, तसंच दूतावासातले कर्मचारी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. उद्याच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतल्या भारतीय दूतावासानंही वॉशिंग्टन इथं योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

राज्य सरकारने शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांच्या आरोग्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या दोन्ही योजनांच्या लाभार्थी घटकांमध्ये शुभ्र शिधापत्रिका धारकांचा समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भात शुभ्र शिधापत्रिका आधार कार्डसोबत संलग्न करण्याचे आदेश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने आज सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना जारी केले आहेत.

शरद पवार

मराठा आणि ओबीसी समाजाच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी केंद्र सरकारनं पुढाकार घेण्याची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज बारामती इथं केलं. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या

समाजांच्या आंदोलनांमुळं सामाजिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून केंद्र सरकारनं काळजी घ्यावी, असं पवार यांनी यावेळी सुचवलं.

चंद्रशेखर बावनकुळे

हिंदुत्वाची भूमिका उद्धव ठाकरे यांनी सोडली हे आता सर्वपरिचित झाले आहे, ते महाविकास आघाडी मधले अन्य घटक पक्ष वाढविण्याचं काम करत असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात केली. ते माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देत होते. शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीत १५५ जागा जिंकू असा दावा केल्याबाबत विचारले असता, बावनकुळे यांनी रोकठोक प्रतिक्रिया देत महाविकास आघाडीनं लोकसभा निवडणुकीत खोटाप्रचार करून मतं मिळवल्याचं ते म्हणाले. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी विकास कामांवर बोलावं असा सल्ला देखील त्यांनी दिला. शरद पवार यांची भूमिका कायम मराठा आरक्षण विरोधात राहिली आहे. त्यांच्या सरकारच्या काळात त्यांना मराठा आरक्षण देता आलं असतं,मराठा समाजाला सवलती देता आल्या असत्या, परंतु ते त्यांनी केलं नाही अशी टीकाही बावनकुळे यांनी यावेळी केली.

जयंत पाटील

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं मंगळवार दिनांक १८ जून रोजी झालेली युजीसी नेट परीक्षा पेपरफुटीच्या शक्यतेमुळं रद्द केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावरून केंद्रसरकारवर कडाडून टीका केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या नीट परीक्षेत झालेला गोंधळ ताजा असताना नेट परीक्षेसंदर्भातला प्रकार म्हणजे सरकारच्या अकार्यक्षमतेचं आणखी एक उदाहरण असल्याचं पाटील यांनी आपल्या सामाजिक प्रसार माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

नीट नोटीस

यंदाच्या नीट अर्थात राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेशी निगडित उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित सर्व खटले सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तांतरीत करण्याची मागणी करणाऱ्या

राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं आज संबंधितांना नोटीस बजावली. तसंच सर्वोच्च न्यायालयानं विविध उच्च न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या नीट संदर्भातल्या सर्व कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या पीठानं हे निर्देश दिले. या सर्व याचिकांवरची सुनावणी येत्या ८ जुलैला होईल.

६५ टक्के आरक्षण

सर्वोच्च न्यायालयानं निर्धारित केलेल्या आरक्षणाच्या 50 टक्के मर्यादेत बदल करून बिहार सरकारनं सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमधील आरक्षण 65 टक्क्यांपर्यंत वाढवले होते. पाटणा उच्च न्यायालयानं आज आरक्षण वाढवणारा हा कायदा समताविरोधी ठरवून रद्द केला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या महाआघाडी सरकारने जाती-आधारित सर्वेक्षण अहवालाच्या आधारे ईबीसी, ओबीसी, दलित आणि आदिवासींसाठी आरक्षण वाढवून 65 टक्के केलं होतं. उच्च जातीतील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी 10 टक्के आरक्षणासह, बिहारमध्ये नोकरी आणि प्रवेशाचा कोटा 75 टक्के झाला आहे. बिहार आरक्षण कायद्याला अनेक संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखालील दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने बिहार आरक्षण कायदा रद्द केला आणि तो घटनेच्या कलम 14, 15 आणि 16 च्या विरोधात असल्याचं म्हटलं आहे.

पाण्याचा विसर्ग

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात असलेल्या चिचडोह बॅरेजमधून उद्या सकाळी 8 वाजता प्रकल्पाच्या सर्व 38 दरवाजातून 190.23 क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येणार आहे. यामुळे नदीतील निम्न भागातील पाण्याची पातळी वाढणार आहे. नदीकाठाने राहणाऱ्या गडचिरोली आणि चंद्रपुर जिल्ह्यातील नागरिकांनी सावधानता बाळगावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात आलं आहे.

आशा स्वयंसेविका पुरस्कार

आज नागपुरात रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीनं आयोजित सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्कार सोहळा पार पडला. मनपा शहरी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशीनगर झोन अंतर्गत कपिल नगर युपीएचसी येथील यजुकला संजय गजभिये यांना प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचा मान्यवरांच्या हस्ते २५ हजार रुपयांचाधनादेश, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. द्वितीय पुरस्कार १५ हजार रुपयांच्या धनादेशासह धतोली झोन अंतर्गत येणाऱ्या बाबुलखेडा युपीएचसी येथील संगीता नितीन वानखेडे यांना प्रदान करण्यात आला. तर तृतीयपुरस्कार धरमपेठ झोन अंतर्गत येणाऱ्या फुटाळा युपीएचसी येथील सारिका दिनेश झाडे यांना प्रदान करण्यात आला.त्यांना मान्यवरांच्या हस्ते ५ हजार रुपयांचा धनादेश, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आलं. आशा स्वयंसेविका या “आशाताई” म्हणून घराघरातील कुटुंबाचा भाग झाल्या आहेत. नागरिक, शासन-प्रशासन स्तरावरही आशा स्वयंसेविकांना “आशाताई” म्हणूनच संबोधले जाते. नागरिकांचा विश्वास त्यांच्यावर आहे, याच विश्वासाच्या जोरावर “आशाताई” आज आपल्या आरोग्य यंत्रणेचा महत्त्वाचा कणा बनल्या असल्याचं प्रतिपादन नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी यावेळी केलं.

विजयराव माताडे-निधन

नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक विजयराव माताडे यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते. यवतमाळ नगर प्रचारक, अचलपूर जिल्हा प्रचारक, अमरावती विभाग प्रचारक त्यानंतर संघ रचनेनुसार विश्व हिंदू परिषदेची विदर्भ प्रांताची जबाबदारी त्यांना देण्यात आली होती. 2014 पासून मुंबई क्षेत्र संघटन मंत्री म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. माजी सहकार्यवाह भय्याजी जोशी, विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य आणि जेष्ठ प्रचारक दिनेश्चंद्र यांनी शोक संदेश पाठवत श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचा अंतिम संस्कार नागपूरातील गंगाबाई घाट इथं आज दुपारी संपन्न झाला.

हवामान

विदर्भात येत्या 24 तारखेपर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं. आज नागपूर, भंडारा आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर अमरावती, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उद्या वादळी पर्जन्यमाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. 22, 23 आणि 24 जूनला विदर्भात सर्वत्र वादळी पर्जन्यमानाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान विदर्भात पुढील चार दिवसात कमाल तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही. मागील २४ तासांत सर्वच जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 33 ते 37 अंश सेल्सिअस दरम्यान नोंदवण्यात आलं आहे.

टी-ट्वेंटी

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर एट मधील ग्रुप एकमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं हा सामना सुरू होणार आहे.

*****